# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/05/2023 (सोमवार) सकाळ


## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपींतांविरूद्ध कारवाई

पो.स्टे. एम.आय.डी.सी. बोरी :— अंतर्गत काठीवाड धाब्या समोर नागपुर वर्धा रोड येथे दिनांक ३०/०४/२०२३ चे ०३.०० वा. दरम्यान एम. आय. डी. सी. बोरी पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, टाकळघाट शिवारात नागपुर वर्धा रोड ने काठीवाडी धाबा समोर काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन एम.आय.डी.सी. बोरी पोलीस पथकाने नाकाबंदी केली असता एक बिना नंबरचे बोलेरो पिकअप संशयीत वाहन मिळुन आल्याने त्या वाहना जवळ जावुन त्याची पाहणी केली असता सदर वाहनात एकुण चार पांढऱ्या रंगाचे व दोन लाल रंगाचे जनावरे निर्दयतेने कोंबलेले, त्या जनावरांचे पायाला व तोंडाला दोरीने बांधुन दिसले यावरुन वाहन चालकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव **आरोपी चालक नामे —विनोद हरिचंद्र खेडकर वय ३२ वर्ष रा. भुगाव ता. कामठी जि. नागपुर** व त्याचे शेजारी बसलेला **निखील कैलास बनकर वय २५ वर्ष रा. किन्ही ता. कुही जिं. नागपुर ह. मु. भुगाव ता. कामठी जि. नागपुर** असे सांगीतले. सदर जनावरां बाबत विचारपुस केले असता सदर जनावरे हे शिहोरा बाजार ता. जि. भंडारा येथुन आणुन यवतमाळ येथे कत्तलखान्यात कटाई करीता घेवुन जात असल्याचे सांगीतले. सदर वाहन चालकास जनावरांचे व वाहनाचे कागपत्रा बाबत विचारले असता त्यांचेकडे जनावरा बाबतचे कोणतेही कागद पत्र नसल्याचे सागीतले तसेच सदर जनावरे हे स्वत: विकत घेतल्याचे सांगितले. सदर वाहना संबंधी कागदपत्रे तसेच वाहन चालवण्याचा परवाना मिळुन आला नाही. सदर वाहनामध्ये ०४ पांढरे रंगाचे बैल व ०२ लाल रंगाचे बैल असे एकुण ०६ जनावरे किंमती अंदाजे ६०,०००/— रु. व बोलेरो पिकअप क्र. MH 40,CM 0595 किंमती अंदाजे ९,००,०००/— रु. असा एकुण वाहनासह ९,६०,०००/— रु. चा मुद्देमाल आरोपींकडुन जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोउपनि. शिवाजी मारोती भताने, वय ४५ वर्षे पोलीस स्टेशन MIDC बोरी यांचे रीपोर्टवरून पोस्टे एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ११(१) (क) प्राण्याचा छळ प्रति. अधि. कलम ५।(१) ५।(२) म.प.सं.अधि. कलम ३४ भादवि कायदाअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोस्टे एमआयडीसी बोरी हे करीत आहेत.

## घरफोडी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ढिवरवाडी येथे दिनांक ३०/०४/२०२३ चे ०८/०० वा. ते २०/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. रत्ना मुकूंदराव बांबल, वय ४५ वर्षे, रा. ढिवरवाडी ता. काटोल ही आपल्या परीवारासह स्वत:चे बहीणीचे लग्नाकरीता काटोल येथे आली होती. दि. ३०/०४/२०२३ रोजी सकाळी ०७/०० वा. फिर्यादीचे पती व मुलगा असे दोघेही घरी येवुन आंघोळपाणी करून सकाळी ०८/०० वाजता लग्नाचे कार्यक्रमाकरीता काटोल येथे परत आले होते. फिर्यादी ही परीवारासह दिवसभर लग्नाचे कार्यक्रमात काटोल येथे हॉलमध्ये हजर होती सायंकाळ पर्यंत हॉलमध्ये थांबुन सायंकाळी ०८/०० वाजता फिर्यादी ही परीवारासह घरी ढिवरवाडी येथे परत गेली असता कोणीतरी अनोळखी इसमाने घराचे दरवाजाचे कुलूप तोडुन कपाटाचे लॉकरमधील २ ग्रॅम वजनाचे सोन्याची कानातील रिंग किंमती अंदाजे १०,०००/—रू. व नगदी १००००/— रू. असा एकुण २०,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अनोळखी इसमाने घरात प्रवेश करून चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गौरव आगरकर ब. नं. ८९१ पोस्टे काटोल मो. क्र. ८४२१७५५८४९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**